बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
बेरार टाईम्स
संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)
चला जाऊया पूर्व विदर्भ पर्यटनाला
बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ

वर्ष -९ | गोंदिया | अंक ४७ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार,दि.२८ ऑक्टोंबर २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021

धान खरेदी केंद्राचा मुहूर्त कधी

गोंदिया: खरीप हंगामातील धान पिकाला शेतकऱ्यांना शासनाच्या हमीभव मिळावा यासाठी प्रत्येक वर्षी १ ऑक्टोबरपासून जिल्ह्यात जिल्हा मार्केटिंग फेडरेशन तसेच आदिवासी विकास महामंडळाच्यावतीने आधारभूत हमीभाव धान खरेदी केंद्र सुरु करण्यात येतात. त्या अनुषंगाने १ ऑक्टोबरपासून ही केंद्र सुरु करण्यासाठी राज्य शासनाने संबंधित अभिकर्ता संस्थांना निर्देश दिले होते. मात्र आजही हे धान खरेदी केंद्र सुरु न झाल्याने शेतकऱ्यांसमोर नवीन संकट निर्माण झाले आहे. तर दुसरीकडे जिल्ह्यातील धान खरेदी संस्थेतील काही संस्थांचा गौडबंगाल बाहेर निघाल्याने त्या संस्थाचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.

यंदाच्या खरीप हंगामात जिल्हा कृषी विभागाने ठेवलेले धान पीक लागडवीचे उद्दीष्ट पूर्ण झाले आहे. जिल्ह्यात सुमारे १ लाख ९४ हजार हेक्टर क्षेत्रावर धान पिकाची लागवड करण्यात आली. हंगामाच्या सुरुवातीस पाऊस उशिरा आल्याने धान पिकाची लागवड थोडी उशिरा झाली. परंतु त्यानंतर आलेल्या सततच्या पावसाने लागवड पूर्ण झाली. व आजघडीला धान पीक जोमात आहे. काही ठिकाणी धान पिकावर किडीचा प्रादुर्भाव दिसून आला आहे.

तर दुसरीकडे हलक्या जातीचा धान कापणीला आला असून दिवाळीपुर्वीच शेतकऱ्यांच्या हमीभावाची रक्कम मिळावी यासाठी प्रत्येक वर्षी खरीप पणण हंगामाच्या अनुसार किमान आधारभूत किंमत खरेदी-विक्री अंतर्गत धान खरेदी केंद्र सुरु करण्यात येतात. विशेष म्हणजे हे केंद्र १ ऑक्टोबरपासून सुरु करण्यात येतात. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्यावतीने २९ सप्टेंबर रोजी आदेश काढून हे केंद्र सुरु करण्याचे निर्देश दिले आहे. किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून शेतकऱ्यांना हमीभावपेक्षा कामी किंमतीने धान्य विकावे लागू नये म्हणून ही योजना राबविण्यात येते. यासाठी जिल्ह्यात जिल्हा मार्केटिंग फेडरेशन तसेच आदिवासी विकास महामंडळाच्या वतीने जिल्ह्यात सुमारे १०० धान खरेदी केंद्र सुरु करुन त्या माध्यमातून शेतकऱ्यांचा धान खरेदी करण्यात येतो. तसेच अभिकर्ता संस्थांनी प्रशिक्षीत ग्रेडर्सकडून तपासणीअंतीच धान, भरड धान्य खरेदी करावे, कमी दर्जाचे धान भरड धान्य खरेदी झाल्यास व त्यामुळे आर्थिक तुट आल्यास किंवा अन्य कोणतीही समस्या उद्‌भवल्यास अभिकर्ता संस्था जवाबदार राहणार आहे. असेही निर्देश शासनाच्या अन्न व पुरवठा विभागाने दिले होते. आज शेतकऱ्यांचा धान विक्रीसाठी तयार असतानाही अद्यापपर्यंत जिल्ह्यात दोन्ही संस्थाच्यावतीने एकही धान खरेदी केंद्र सुरु झाले नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे.

अनेक संस्थांचे परवाने रद्द

जिल्ह्यात पोलीस अधिक्षकाच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्याच्या सुचना अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सहसचिव मनोजकुमार सूर्यवंशी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. यामुळे धान खरेदीतील भ्रष्टाचार उघड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खरीप व रब्बी हंगाम २०१९-२० मध्ये भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यामध्ये धान खरेदीत झालेला भ्रष्टाचार या अनुषंगाने आपण चौकशी केली आहे. सदर अहवालात मोठ्या प्रमाणात गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. तथापी त्यावर अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे शासनाच्ळा निदर्शनास आले आहे.

तरी सदर प्रकरणात दोषीवर कठोर कारवाई करावी असेही त्या पत्रात उल्लेख असल्याने हा भ्रष्टाचार उघड होवून दोषीवर कारवाई होणार, अशी आशा निर्माण झाली आहे. त्यातच जिल्ह्यातील गोरेगाव, सालेकसा व गोंदिया या तीन तालुक्यातील काही संस्थांचे परवाने जिल्हा प्रशासनाने रद्द केले आहेत. या संस्थेतील गैरप्रकार समोर आल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. असे असले तरी उर्वरित धान खरेदी केंद्र अद्याप सुरु न झाल्याने ऐन दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांचा हिरमोड होत आहे.

लाखनी येथे फटाक्याच्या दुकानाला आग,११ लाखाचे नुकसान

लाखनी: येथील एका फटाक्याच्या दुकानाला आग लागल्याची घटना मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या आगीत फटका दुकानासह लगतचे कापड व फुलाचे दुकानही भस्मसात झाले. यात ११ लाखांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.लाखनी येथे सिंधी लाईनमध्ये अंबिका फटका सेंटर आहे. दिवाळी निमित्त या दुकानात फटकाने मोठ्यप्रमाणात ठेवले होते.

सोमवारी रात्री दुकान नेहम ीप्रमाणे बंद करण्यात आले. मात्र मध्यरात्रीच्या सुमारास अचानक फटक्यांचा आवाज येवू लागला. नागिकांनी धाव घेतली असता फटाक्याच्या दुकानाला आग लागल्याचे दिसून आले. नागरिकांनी तात्काळ एका बांधकाम कंपनीचे पाण्याचे टँकर आणून आग विझविली. मात्र तोपर्यत दुकान जळून खाक झाले होते. यात २ लाखांचे नुकसान झाले, तर लगतचे नागराज कोठेकर यांचे फ ुलांचे दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले, त्यात त्यांचे ७ लाखांचे तर लक्ष्मी कापड दुकानाचे दोन लाखाचे असे एकूण ११ लाखांचे नुकसान झाले.

आज सालई खुर्द येथे पाण्यासाठी पुन्हा शेतकऱ्यांचा रास्ता रोको आंदोलन

शेतकऱ्यांचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न? शेतकरी आक्रोश

सालई खुर्द :- शेतकऱ्यांना उन्हाळी धानपिकासाठी बावंनथडी प्रकल्पाचे पाणी नेरला (सालई खुर्द) कालवा क्रमांक २ ला देण्यात यावे, या मागणीसाठी रास्ता रोखो आंदोलन करण्यात आले होते मात्र प्रशासन तर्फे लिखीत आश्वासना नंतर आंदोलन मागे घेतले होते.आश्वासनाची पूर्तता न केल्याने पुन्हा दि.२८ ऑक्टोबर रोज बुधवार सकाळी १० वाजता रामटेक-तुमसर राज्यमार्गावर सालई खुर्द येथे शेतकऱ्यांकडुन रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आशयाचे उपअधीक्षक अभियंता पाटबंधारे जल संपदा विभाग भंडारा, जलसंपदा राज्य मंत्री बच्चू कडू, विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, खासदार सुनील मेंढे, जिल्हाधिकारी भंडारा, पोलीस अधीक्षक भंडारा, सहाय्यक अभियंता (श्रेणी एक) बावंनथडी पाटबंधारे उपविभाग बघेडा(तुमसर), आ. राजू कारेम ोरे, माजी आ. चरण वाघमारे, तहसिलदार घनश्याम सोनकुशरे, सहायक पोलिस निरीक्षक दीपक वानखेडे आंधळगाव यांना देण्यात आले आहे.

शेतकऱ्यांचे आम्हीच खरे कैवारी असे प्रत्येक राजकीय पक्ष म्हणतो. सत्तेतील सगळेच मंत्री भूमिपुत्र असल्याचा गौरवाने उल्लेख करतात. मग शेतकऱ्यांचे हाल त्यांना का दिसत नाही? महिन्याभरापासून शेतकरी पाण्यासाठी झडत आहे व आंदोलने केली मात्र राज्यात उद्धव सरकार व केंद्रात मोदी सरकार असूनही कोणत्याही जण प्रतिनिधीनी ठुकून पाहिले नाही, जिल्ह्यातील स्थ-ानीक लोकप्रतिनिधी शेतकऱ्याचे एकीकडे योगदानाचे कौतुक करीत असताना तर दुसरीकडे खच्चीकरण करतात. शेतकऱ्यांचे कैवारी कोणी नाही. सालई खुर्द परिसरातील शेतकरी आक्रोश मध्ये असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

या वर्षी बावंनथडी प्रकल्प ९९ टक्के जलसाठा असून बावंनथडी प्रकल्प ४५०० हेक्टर जागेला पाणी देणार असल्याचे नियोजनात आहे, मात्र ४५०० हेक्टर जागेत सर्व शेतकरी उन्हाळी धान पीक घेत नाही, काही जमीन पडीत, बंजर, लाखोरी, चना, गहू, फळभाजी व काही जमीन बोअरवेल खाली येते, त्यातून उरलेली जमीन कमी करून सालई खुर्द क्रमांक २ कालव्याला ५०० हेक्टर वाढ करून उन्हाळी धान पिकाला पाणी देण्यात यावे.

सालई खुर्द, सिहरी, बपेरा पालडोंगरी, उसर्रा, टांगा, राम पूर, नेरला, मलिदा, डोंगरगाव, पिंपळगाव, मोहाडी, महालगाव आदी परिसरात या वर्षी धान पिकांवर मावा तुडतुड्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असताना शेतकरी संकटात सापडला आहे, त्यामुळे या वर्षी उन्हाळी धानपिकाला बावनथडी धरणाचे पाणी देण्यात यावे अशी मागणी निवेदनात अशोक पटले, नितीन लिल्हारे, प्यारेलाल दमाहे, श्रीकांत बन्सोड, प्रकाश खराबे, डॉ सुनील चवळे, किशोर भैरम, महेश पटले, नंदलाल लिल्हारे, भोलाराम पारधी, ईश्वरद्याल गिरीपुंजे, शोभाराम गिरीपुंजे, झनकलाल दमाहे, ईश्वर बोन्द्रे, शिवदास दमाहे, अशोक अटराहे, अमोल बेलेकर, प्रदीप बंधाटे, गजानन दमाहे, महेंद्र सव्वालाखे, गणेश दमाहे, बबन टाले, प्रदीप सरोते, गोपाल लिल्हारे, शिवदास लिल्हारे, राम द्याल नागपुरे आदी शेतकऱ्यांनी केली आहे.

आंदोलनकर्त्याना पुन्हा नोटीस

निवेदन देवुनही उन्हाळी धानपिंकासाठी बावनथडी प्रकल्पाचे पाणी देण्याचे आश्वासन प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांकडुन मि ळत नसल्याने शेतकऱ्यांनी सालई खुर्द येथे बुधवार ला रास्ता रोको आंदोलन आयोजित केला आहे. कोरोनाचे कारण समोर करुन हा आंदोलन उधळून लावण्यासाठी आंधळगाव पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक वानखेडे यांनी आंदोलन कर्त्यावर कारवाई करण्याचे नोटीस आधीच शेतकऱ्यांना दिले आहे.

दोन दिवसानंतर पुन्हा कोरोना रुग्णांनी गाठली शंभरी

गोंदिया: गोंदिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून आज २७ ऑक्टोबर रोजी प्राप्त अहवालात नविन १०० कोरोना पॉझिटिव्ह रूग्ण आढळले आहे. १३० रूग्णांनी कोरोनावर मात केल्याने आज त्यांना सुट्टी देण्यात आली. तर दोन रुग्ण उपचारादरम्यान दगावले.

नव्याने १०० कोरोना बाधित रुग्ण आढळले. ती रुग्णांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे. गोंदिया तालुका-५२, तिरोडा तालुका-०४, गोरेगाव तालुका-०६,आमगाव तालुका-१७, सालेकसा तालुका-०६, देवरी तालुका-०२, सडक/अर्जुनी तालुका-०४, अर्जुनी/मोरगाव तालुका-०९ रुग्ण आढळून आले.

आजपर्यंत तालुकानिहाय आढळलेले बाधित रुग्ण पुढीलप्रम ाणे. गोंदिया तालुका-५४०७, तिरोडा तालुका-११२८, गोरेगाव तालका-३८८,आमगाव तालुका-६६३, सालेकसा तालुका-३९७, देवरी तालुका-४४७, सडक/अर्जुनी तालुका-४०५,अर्जुनी/मोरगाव तालुका-५०० आणि बाहेर जिल्हा व इतर राज्यात आढळलेले-१०७ रुग्ण आहे.असे एकूण ९४४२ रुग्ण कोरोना बाधित आढळले आहे.

जिल्ह्यातील शासकीय व खाजगी कोविड रुग्णालय तसेच कोविड केन्द्रात उपचार घेत असलेल्या १३० रूग्णांनी आज कोरोनावर मात केली. तालुकानिहाय ती रुग्ण संख्या पुढीलप्रमाणे. गोंदिया तालुका-७१, तिरोडा तालुका-१७, गोरेगाव तालुका-०१, आमगाव तालुका-१७, सालेकसा तालुका-००, देवरी तालुका-१४, सडक/अर्जुनी तालुका-०३, अर्जुनी/मोरगाव तालुका-०७ असे रुग्ण आढळले.

कोरोनावर आतापर्यत ८४८४ रूग्णांनी मात केली. ती रुग्ण संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे.गोंदिया तालुका-४८५०, तिरोडा तालुका-१०८५, गोरेगाव तालुका-३५४, आमगाव तालुका-६०४, सालेकसा तालुका-३६७, देवरी तालुका-३८४, सडक/अर्जुनी तालुका-३७१, अर्जुनी/मोरगाव तालुका-३८४ आणि बाहेर जिल्हा/राज्यातील ८५ रुग्णांचा समावेश आहे.

आज रोजी क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रूग्णांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. गोंदिया तालुका-४८५, तिरोडा तालुका-२६, गोरेगाव तालुका-३०, आमगाव तालुका-५३, सालेकसा तालुका-२८, देवरी तालुका-५९, सडक/अर्जुनी तालुका-३१,अर्जुनी/मोरगाव तालुका-११२ आणि बाहेर जिल्हा व बाहेर राज्यातील १२ असे एकूण ८३६ रुग्ण कोरोना क्रियाशील आहेत.

४३० क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहे. तालुकानिहाय ते पुढीलप्रम ाणे. गोंदिया तालुका-२१५, तिरोडा तालुका-२७, गोरेगाव तालुका-१६, आमगाव तालुका-२४, सालेकसा तालुका-१२, देवरी तालुका-७१, सडक/अर्जुनी तालुका-०९, अर्जुनी/मोरगाव तालुका-५६ रुग्ण आहेत.

जिल्ह्यात कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ८७.६१ टक्के आहे. बाधीत रुग्णांचा मृत्यु दर हा १.२४ टक्के आहे. तर डब्लिंग रेट हा ८७.२ टक्के आहे.

धानपिकाचे पंचनामे करून त्वरित नुकसानभरपाई दया-आमदार रहांगडाले

तिरोडा- गोंदिया जिल्ह्यात जास्तीत जास्त शेतकरी धानपिक उत्पादन घेत असून सद्या हलक्या प्रतीचे धान कापणीला सुरुवात झालेली आहे.यावर्षी सप्टेंबर महिन्यात वैनगंगा नदीला पूर आल्यामुळे नदीकाठी असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रम ाणात नुकसान झाले असून धान उत्पन्नात घट झालेली आहे. यातच ऐन धान कापणीच्या वेळेला म ावा-तुळतुळा रोगाच्या प्रादुर्भावाने धानपिकाचे मोठे नुकसान झाले असून कोरोणा महामारीत शेतकऱ्यांवर आर्थिक संकट निर्माण झाल्याच्या परिस्थितीत शासनाने मावातुडतुडाने नुकसान झालेल्या धानपिकाचे तत्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई देण्यात यावी याबाबतचे निवेदन आमदार विजय रहागंडाले यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठवले आहे.

पत्रकारितेची आवड आणि व्यावसायीक जाण असणाऱ्या इच्छुक अनुभवी व्यक्तींनी आपल्या बायोडाटासह त्वरित खालील पत्यावर संपर्क करावा.
संपूर्ण विदर्भात
तालुका व जिल्हा प्रतिनिधी पाहिजेत
-: संपर्क :-
बेरार टाईम्स
डोलारे सिमेंट एजन्सी समोरील रस्ता
मनोहरभाई पटेल वार्ड क्रमांक ४ शिवनगर,
गोंदिया-४४१६४१
मो.८०८०८१५३२९, ८२७५२८४६०१
email id-berartimes@gmail.com,

स्वतंत्र असूनही होताहे पारतंत्र्याचा भास

चिचगड: देशाला स्वातंत्र्य मि ळून सतरी लोटली. मात्र अद्यापही शासकीय आणि प्रशासकीय अनास्थेमुळे अनेक भागातील विकासाला गती मिळाली नाही. देवरी तालुक्यातील घनदाट जंगल आणि संपूर्ण आदिवासी बांधव वास्तव्य करत असलेल्या करुझरी या गावात साधा रस्ता तयार करण्यात आला नाही. इतर योजनांचा तर नामनिराळाच. त्यामुळे या गावातील नागरिकांना अद्यापही पारतंत्र्यात असल्याचा भास होत आहे.

देवरी तालुक्यातील अतिदुर्गम नक्षलग्रस्त आणि संपूर्ण आदिवासी समाजाची लोकवस्ती असलेले शेवटच्या टोकावरील करुझरी हे गाव आहे. या गावात स्वातंत्र्याचे ७० वर्ष लोटून देखील साधे रस्ते तयार झालेले नाहीत. त्यामुळे हे गाव विकासाच्या प्रवाहापासून दूर आहे. गावात १५० लोकसंख्या असून लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या दुर्लक्षीत धोरणामुळे येथील भोळ्या आदिवासींना अद्यापही पारतंत्र्यात असल्याचा भास होत आहे. या गावात जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. गावात येण्या-जाण्याकरिता एक कच्चा मार्ग आहे. किर्रर करणाऱ्या जंगलातील या खडकाळ रस्त्यावरुन साधी सायकल देखील चालविता येत नाही. मध्येच एक नाला आहे. या नाल्यावर अद्याप पूल तयार करण्यात आला नाही. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात नाल्याला पूर आल्यस या गावातील नागरिकांना तालुका आणि नजीकच्या गावांशी संपर्क तुटतो. या गावात पोहोचमार्ग तयार करण्याकरिता २०१५-१६ या आर्थिक वर्षात ३३ लाख २९ हजार २०० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीतून अकुशल काम करण्यात आले. त्यावर २ लाख ५० हजार रुपये खर्च झाले. मात्र त्यानंतर काम बंद झाले. निधीचे काय झाले, यासंदर्भात गावकरी एकम ेकाला विचारणा करत आहेत. उर्वरित निधी कुणाच्या घशात गेला? यावर प्रश्नचिन्ह उभे आहे. गावात सिंचनाची सोय नसल्याम ुळे पावसाअभावी शेतकऱ्यंना दरवर्षी नापिकीचा सामना करावा लागतो. देशाला स्वातंत्र्य मिळून ६५ वर्ष लोटली. आजपर्यंत आलेल्या सर्वच शासनकर्त्यांनी विकासाच्या बाता हाकल्या. परंतु प्रत्यक्षात विकास तळागाळापर्यत पोहोचलेच नसल्याची साक्ष देवरी तालुक्यातील करूझरी हे गाव देत आहे.

लग्न जुळण्यास अडचण

देवरी तालुक्यातील करुझरी हे १५० लोकवस्तीचे गाव विकासापासून वंचित आहे. या गावात साधे रस्ते नाहीत. शासनाच्या विविध योजनांचा लाभ येथे पोहोचला नाही. शिवाय शंभरटक्के आदिवासी गाव असल्यामुळे या गावाकडे अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचे देखील दुर्लक्ष आहे. या गावात कुणी मुलगी देण्यास किंवा या गावातील मुलीशी लग्ण करण्याकरिता नकार देतात.

आदिवासींना सुविधांपासून वंचित ठेवण्याचा डाव

आदिवासी समाज आधीच मागासलेला आहे. या सम ाजाच्या उत्थानाकरिता योजना राबविण्यात येत असल्याचा वडेजाव आतापर्यंतच्या सर्वच सत्ताधाऱ्यानी केला. प्रत्यक्षात स्थिती वेगळीच आहे. निवळ कागदोपत्री योजना राबवून विकासाच्या बाता हाकण्यात येत असल्याचा प्रत्यक्ष करुझरी या गावाकडे बघितल्यास येतो. शासनाचा उद्देश मागासलेल्या आणि विकासापासून कोसो दूर असलेल्या आदिवासी समाजाला विकासापासून दूर राखण्याचाच तर हेतू नाही अशी शंका मनात कुचकुचते.

नक्षल प्रभावित ५१ गावात पोलीस साजरी करणार दिवाळी



गोंदिया : भारतीय संस्कृतीत दिवाळी सर्वात मोठे व महत्वाचे सण आहे. गरीब असो वा श्रीमंत, प्रत्येक व्यक्ती आपल्या मि ळकतीनुसार सण साजरा करतो. परंतु, यावर्षी पोलीस जिल्ह्याच्या उत्तर-पूर्व दिशेत पसरलेल्या ५१ गावांतील आदिवासी नगरिकांसह दिवाळी साजरी करण्याचा निर्धार अप्पर पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी केला आहे.यासाठी सामाजिक संघटनांसह इतरांना भेटवस्तू व साहित्य १२ नोव्हेंबरपर्यत दे-वरीतील अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालयात गोळा करण्याचे आवाहनही केले आहे.विशेष म्हणजे गडचिरोली-गोंदिया परिक्षेत्राचे उपमहानिरिक्षक संदिप पाटील यांनी यासाठी पुढाकार घेतला असून गडचिरोली जिल्हा पोलिसांनीही यासाठी पुढाकार घेतला आहे.

या ५१ नक्षल प्रभावित गावांची लोकसंख्या १० हजार ९७६ आहे. या आदिवासी गावांमध्ये शिक्षण घेणारी मुले व इतर लोकांची दयनीय स्थिती आहे. या गावांमध्ये नक्षलवाद्यांची क्रियाशीलता दिसून येते. आदिवासी नागरिक आपल्या उत्पन्नानुसार आपली व कुटुंबाच्या मूलभूत गरजा पूर्ण करतात. त्यांना अधिकतर वेळी अर्धनग्न अवस्थेत राहावे लागते. एकीकडे आधुनिक युगात विकासाची गती वाढत असताना दुसरीकडे आदिवासी भाग अद्याप मागासलेलाच आहे. या समाजाला मूलभूत सुविधांची गरज आहे. प्रेमाची आवश्यकता आहे.

या बाबींकडे लक्ष देत जिल्हा पोलीस विभागाद्वारे आदिवासी बांधवांसह दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आदिवासी नागरिक, त्यांच्या मुलांना मदत मिळावी, यासाठी पोलीस विभागाद्वारे उल्लेखनीय पुढाकार घेण्यात आला आहे. यासाठी जिल्ह्यातील नागरिक सुद्धा मदत करू शकतात.

याद्वारे होऊ शकेल मदत

नागरिक आदिवासी मुले, नागरिकांसाठी नोटबुक, डायरी, पेन्सिल, रबर, शार्पनर, जेवणाचा डबा, बॅग, कंपास, सोलार लॅम्प, लहान बालकांचा बेड, शर्ट, पँट, बांगड्या, जोडे, चप्पल, सप-ोर्ट टी शर्ट, पँट पीस, स्टील ग्लास, भांडी, गोड वस्तु, सामान्य ज्ञान पुस्तके, कथा-कादंबरी, आत्मचरित्रावर आधारित पुस्तके, क्रिकेट बॅट, बॉल, वॉलीबॉल, फूटबॉल, बॅटमिंटन, कॅरम बोर्ड, बॅटमिंटन नेट आदि वस्तू नागरिक भेटस्वरुपात देऊ शकतात.